# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 04.03.2025** **वार- बुधवार**

---

**अंदाजपत्रक**

पुणे महानगरपालिकेचं २०२५-२६ या वर्षाचं, कोणतीही करवाढ नसलेलं १२ हजार ६१८ कोटीं रुपयांचं अंदाजपत्रक आयुक्त डॉ राजेंद्र भोसले यांनी आज स्थायी समितीला सादर केलं. आणि प्रशासक म्हणून या अर्थसंकल्पाला मान्यता दिली. गेल्या वर्षीपेक्षा अंदाजपत्रकात 1 हजार  17 कोटीं रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. प्रशासक काळातील हा तिसरा अर्थसंकल्प आहे. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी, नगरसचिव योगिता भोसले, नगर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्यासह सर्व खाते प्रमुख यावेळी उपस्थित होते.

या अंदाजपत्रकात पाणीपुरवठा विभागासाठी 1 हजार 665 कोटी, मलनिस्सारणासाठी 1 हजार 431 कोटी, घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी 1 हजार 142 कोटी, आरोग्य विभागासाठी 5 शे 70 कोटी, नगररचना नियोजनासाठी 1 शे 8 कोटी, वाहतूक नियोजन आणि प्रकल्पासाठी 2 शे 80 कोटी, पथ विभागासाठी 1 हजार 626 कोटी अशा भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत.

स्वच्छता, आरोग्य आणि पायाभूत सुविधांवर अंदाजपत्रकात भर देण्यात आला आहे. नागरिकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी परिमंडळ उपायुक्त स्तरावर तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात येणार आहे. साथरोग रोखण्यासाठी महानगर सर्वेक्षण विभाग तयार करण्यात येणार असून यात प्रयोगशाळा आणि

प्रशिक्षीत कर्मचारी असतील. समाविष्ट ३४ गावांसाठी ६२३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महापालिका शाळांसाठी “सिस्टर स्कूल”  ही योजना राबवण्यात येणारा असून शाळेत सीसीटीव्ही बसवले जाणार आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेतून 4 हजात 173 घरे माफक दरात देण्यात येणार आहेत. 24 तास समान पाणीपुरवठा योजना, नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, मुळा-मुठा सुशोभीकरण योजना, अत्याधुनिक स्वच्छतागृह आदी कामांसाठीही या अंदाज पत्रकात भरीव तरतूद करण्यात आली आहे.

**साखरआयुक्त**

अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी सिध्दराम सालिमठ यांनी काल पुण्यात राज्याच्या साखर आयुक्तपदाचा पदभार स्वीकारला. साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार यांची बदली झाल्यानंतर सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. आता पूर्णवेळ साखर आयुक्त मिळाल्यामुळे साखर उद्योगाशी संबंधित विविध प्रश्न सोडवण्यास मदत होणार आहे.

PCMC

पर्यावरण संवर्धन तसंच सार्वजनिक वाहतूकीला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं पिंपरी-चिंचवड महानगरपालिका पहिल्यांदाच वाहनमुक्त दिवस उपक्रमाचं आयोजन करणार आहे. येत्या शनिवारी आणि रविवार सकाळी ८ ते रात्री ९ या कालावधीत हा उपक्रम पिंपरी मार्केट परिसरात, साई चौक ते महर्षी वाल्मिकी चौक परिसरात राबवला जाणार आहे. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या २५ लाख असून शहरात २३ लाखांहून अधिक वाहनं आहेत.

**महिलादिन**

जागतिक महिला दिनाच्या निमित्तानं १८ ते २७ वर्ष वयोगटातील मुलींसाठी येत्या शनिवारी पुण्यात रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार आणि उद्योजकता विभागानं यशस्वी कौशल्य विकास संस्थेच्या सहकार्यानं हा मेळावा आयोजित केला आहे.

चिंचवडच्या यशस्वी भवन इथं सकाळी नऊ पासून या रोजगार मेळाव्याला सुरुवात होणार आहे. यात सहभागी होण्यासाठी कोणत्याही प्रकारचं शुल्क आकारण्यात येणार नाही; इच्छुक मुलींनी नावनोंदणी करावी कळविण्यात  आले आहे.

**<u>अत्याचारप्रकरण</u>**

पुण्याच्या स्वारगेट बस स्थानकातील महिला अत्याचार प्रकरणातील पीडित महिलेचा जबाब काल बंद लिफाफ्यातून न्यायालयात सादर करण्यात आला. दरम्यान पीडित महिलेबाबत समाज माध्यमांवर उलट सुलट चर्चा करणाऱ्यांवर प्रतिबंध घातला जावा, यासाठी विधीज्ञ असीम सरोदे यांनी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

**<u>महिलाक्रिकेट</u>**

23 वर्षांखालील महिलांच्या मर्यादित षटकांच्या बीसीसीआय एलिट क्रिकेट चषक मालिकेला उद्यापासून चंदीगडमध्ये सुरुवात होत आहे. यासाठी महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने महिलांचा संघ जाहीर केला आहे. महाराष्ट्राच्या संघाचं नेतृत्व पुण्याची इशा पठारे करणार आहे, तर चिंचवडच्या खुशी मुल्ला हिच्याकडे उपकर्णधारपद सोपवण्यात आलं आहे. महाराष्ट्राच्या संघात इशिता खाली, ईश्वरी अवसारे आणि गायत्री सुरवसे या पुण्यातल्या महिला क्रिकेटपटूंना संधी देण्यात आली आहे. महाराष्ट्रासह पॉण्डीचेरी, नागालँड, दिल्ली, पश्चिम बंगाल आणि गुजरातचा संघ यात भाग घेत असून 13 मार्चपर्यंत साखळी सामने होतील; त्यानंतर 24 मार्च रोजी उपांत्य फेरी तर 26 मार्च रोजी अंतिम फेरी पार पडणार आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल 37 तर किमान 16 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. उद्याही साधारण असंच तापमानात राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.